Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VI | ISSUE-X | OCTOBER | 2019 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 5.707 | ISSN 2349-638x

# इंदिरा गांधी आणि आणिबाणी

डॉ. एल.बी. डोंगरे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर जि.नांदेड. 431802

भारतीय राजकारणातील एक प्रभावशाली व्यक्तीमत्व म्हणजे श्रीमती इंदिरा गांधी होत. त्यांच्या नेतृत्वाचा प्रभाव आणि परिणाम भारतातच नव्हे तर भारताबाहेरही होता. मातृछत्र हरवल्यानंतर वडिल पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या सानिध्यात त्यांच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण झाली. इंदिरा गांधी यांचे व्यक्तीमत्व धाडसी, साहसी, दुरदृष्टी, कार्यक्षम, राष्ट्रवादी होते. वडिल जवाहरलाल नेहरु हे आदर्शवादी असले तरी त्यांच्या आदर्शवादाला इंदिरा गांधी यांनी व्यवहारवादाची जोड दिली. लाल बहादुर शास्त्री यांच्या निधनानंतर भारताच्या पंतप्रधानपदाची सुत्रे इंदिरा गांधीजीकडे आली. इंदिरा गांधी यांनी आपल्या पंतप्रधानाच्या कार्यकाळात अनेक धडाडीचे आणि धाडसी निर्णय घेतले. त्यामध्ये भारत - पाक युध्द, सिमला करार, अणु चाचणी, आणिबाणी, बँकांचे विलीनीकरण, गरीबी हटाव, नसबंदी कार्यक्रम, सिक्कीमचे विलीनीकरण, ४२ वी घटना दुरूस्ती, ऑपरेशन ब्ल्यु स्टार हे क्रांतीकारी निर्णय आहेत. यापैकी आणिबाणीच्या निर्णयाचे विश्लेषण केले आहे. इंदिरा गांधी यांचा हा आणिबाणीचा निर्णय हुकूमशाही मानसिकतेचा होता की त्यावेळची अपरिहार्यता होती. याशिवाय आणिबाणीमुळे भारतीय लोकशाहीचे संरक्षण झाले की संकोच झाला हे अभ्यासणे महत्वाचे आहे.

इंदिरा गांधी यांनी १९६६ मध्ये भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या होत्या. १९६७ साली सार्वत्रिक निवडणूका होवून काँग्रेस पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले आणि इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान झाल्या. मुळात इंदिरा गांधी यांचा स्वभाव धाडसी आणि महत्वाकांक्षी होता. त्यांची काम करण्याची पध्दत, निर्णय घेण्याची पध्दत यामुळे लोकशाहीला हरताळ फासला जात होता. यामुळे पक्षातील वरिष्ठ नेत्यांचा गट त्यांच्या कार्यपध्दती बाबत प्रचंड नाराज होता. मोरारजी देसाई सारख्या नेत्यांना फुट पाडण्याच्या हालचाली सुरु केल्या. याचा विपरीत परिणाम असा झाला की काँग्रेस पक्ष हा दोन गटात विभाजीत झाला. १९६९ साली एक मोठा गट इंदिरा गांधी बरोबर आल्यामुळे राजकीय पातळीवर अस्थिरता निर्माण झाली नाही. या संधीचा नेमका फायदा घेत इंदिरा गांधी यांनी विरोधकांना एकटे पाडण्यासाठी लोककल्याणकारी कार्यक्रमाचा निर्णयाचा धडाका सुरु केला. याच काळात त्यांनी गरीबी हटाव, संस्थानिकांचे तनखे बंद करणे, चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण यासारखे लोककल्याणकारी निर्णय घेवून आपली लोकप्रियता वाढवली.

१९६७ ते १९७४ या काळात अशा काही घटना घडत गेल्या ज्यामुळे जुन १९७५ मध्ये इंदिरा गांधी यांना आणिबाणी घोषीत करण्यास भाग पाडले गेले. यामध्ये भारतातील सामाजिक आर्थिक विषमता, भारतात रुजू होवू घातलेला नक्षलवाद, नक्षलवादी भारताच्या प्रस्थापित व्यवस्थेसमोर मोठे आव्हान उभे केले होते. काँग्रेस पक्षातील सिंडीकेट आणि इंडिकेट वाद यामुळे काँग्रेस पक्ष फुटला. डॉ.रामशुभंग सिंह हे पहिले विरोधी पक्ष नेते बनले. या पक्ष फुटीमुळे इंदिरा गांधी यांचे सरकार अल्पमतात आले आणि इंदिरा गांधी यांना लोकसभा बरखास्त करण्याची शिफारस राष्ट्रपतीला करावी लागली.

१९७१ मध्ये झालेल्या लोक सभा सार्वत्रिक निवडणूकांत काँग्रेस पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले. परंतु देशात अशांत आणि अस्थिर परिस्थिती होती. मोरारजी देसाई यांनी गुजरातमध्ये अशांतता आणि अस्थिरता निर्माण करण्यास सुरुवात केली. यातून आंदोलने, संप, बंद ची सुरुवात झाली. १९७१ मध्ये महागाई, भ्रष्टाचार, बेकारी यामुळे गुजरातमधील विद्यार्थ्यांनी आंदोलने केली. या आंदोलनातून जनसंघाच्या नेत्यांनी पाठींबा दिल्यामुळे ही आंदोलन अधिकच तिव्र झाली. जॉर्ज फर्नांडीस सारख्या कामगार नेत्याने भारतात सर्वात मोठा रेल्वे कर्मचाऱ्यांचा संप घडवून आणला होता. या संपाने भारताचे संपूर्ण जनजीवन ठप्प झाले होते. त्याच बरोबर महागाई, भ्रष्टाचार, अन्नटंचाई या समस्यांच्या विरोधात मध्यमवर्गीय जनता व विद्यार्थी रस्त्यावर उतरले होते. या आंदोलनाचे नेतृत्व जयप्रकाश नारायण सारख्या समाजवादी नेतृत्वाने केल्यामुळे ते राजकीय बनले. अशा विविध आंदोलनाच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारांना कोंडीत पकडण्यात आले होते. या नेत्यांच्या प्रक्षोभक भाषणांनी हे आंदोलन हिंसक बनले होते. जयप्रकाश नारायण यांनी कुशासन आणि भ्रष्टाचाराविरुध्द बुलंद आवाज उठवला होता. एप्रिल १९७४ मध्ये गया येथील मोर्चावर पोलीसांनी केलेल्या गोळीबारात चार विद्यार्थी ठार झाले होते. या आंदोलनात समाजवादी नेते जयप्रकाश नारायण यांनाही लाठया खाव्या लागल्या. एकंदरीत तत्कालीन परिस्थिती अराजक, अशांत आणि आस्थिर बनली होती. विरोधक इंदिरा गांधी यांना वेगवेगळया मुद्दयांवरुन कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करीत होते.

गुजरातमधील विद्यार्थ्यांचे नवनिर्माण आंदोलनाने उग्र रुप धारण केले होते. या नवनिर्माण आंदोलनाला जनसंघाच्या नेत्यांनी व इंदिराजींच्या विरोधकांनी याचा फायदा घेतला. या नवनिर्माण आंदोलनात ८५ जण ठार झाले होते. या आंदोलनाची तिव्रता जशी जशी वाढत गेली तशी विरोधकांच्या मागण्या वाढत गेल्या. विरोधक गुजरातच्या मुख्यमंत्र्याच्या राजीनाम्याची मागणी करु लागले. मुख्यमंत्री जिवनभाई पटेल यांच्या विरुध्द भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले. विरोधकाच्या मागणीमुळे गुजरात मध्ये राष्ट्रपती राजवट लागु करण्यात आली. गुजरातमधील राष्ट्रपती राजवटीच्या कार्यवाहीने विरोधक समाधानी झाले नव्हते. त्यांनी विधानसभा बरखास्त करुन निवडणूका घेण्याची मागणी रेटून धरली. गुजरात विधानसभा बरखास्त करण्यासाठी मोरारजी देसाई यांनी ११ दिवसांचे अमरण उपोषणाची घोषणा केली होती. मोरारजी देसाई यांच्या उपोषणाच्या परिणामांची भिती वाटत असलेल्या सरकारने १५ मार्च रोजी विधानसभा बरखास्त केली. मोरारजी देसाईंनी आपले उपोषण मागे घेतले. गुजरात विधानसभा निवडणूका झाल्या. यात काँग्रेस पक्षाचा दारुण परभाव होवून विरोधी पक्षाकडे सत्ता गेली. गुजरात विधानसभा जिंकल्यानंतर विरोधकांचा आत्मविश्वास वाढला. त्यांनी आता इंदिरा हटाव अशी मागणी करुन इंदिरा गांधी यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी केली. यामुळे देशांत अधिकच अशांतता, अस्थिरता, अराजकता निर्माण झाली.

रेल्वेमंत्री एल.एन.मिश्रा यांचा बिहारमधील खुन, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधिशांवरील हल्ला या सर्व घटनांमुळे इंदिरा गांधी यांनी असे वाटत होते की, विरोधक हे लोकशाहीच्या मुळावर आले आहेत असे वाटले. चारही बाजूने विरोधकांनी इंदिरा गांधी यांना कोंडीत पकडल्यामुळे इंदिरा गांधी या एकाकी पडून त्यांचे मनोबल खचले होते. त्या स्वतःला असुरक्षित समजु लागल्या अशा वेळी विरोधकांवर मात करण्यासाठी अनियंत्रित परिस्थितीला सावरण्यासाठी एकमेव मार्ग म्हणुन आणिबाणीचा पर्याय स्विकारावा लागला. त्यांच्या कायदेविषयक सल्लागारानींही आणिबाणीचा निर्णय दिला. शेवटी २५ जुन १९७५ रोजी इंदिरा गांधी यांनी आणिबाणी घोषीत केली. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्यापासून अंतर्गत आणि बाहयगत आव्हानांचा त्यांना सतत सामना करावा लागल्यामुळेच आणिबाणीचा निर्णय इंदिरा गांधी यांना घ्यावा लागला असल्याचे दिसून येते.

आणिबाणी ही काहींना हुकूमशाहीची काळरात्र वाटली तरी काहींना नव्या युगाची पहाट वाटली. आणिबाणी ही लोकशाही संकोचासाठी नाही तर संरक्षणासाठी आहे असे इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या. या आणिबाणीमुळे सार्वजनिक जीवनातील बेशिस्त कमी झाली, विद्यापीठातील आंदोलने कमी झाली, गुन्हयाचे प्रमाण कमी झाले, कायदा सुव्यवस्था सुधारली, औद्योगिक उत्पादन वाढले. २६ जुन १९७५ रोजी वृत्तपत्रावर बंधने आणली. वृत्तपत्रांची विज कापण्यात आली. अर्थात वृत्तपत्र स्वातंत्र्यावर बंधने मर्यादा आणल्या. आणिबाणीला विरोध करणाऱ्या हजारो नेत्यांना, कार्यकर्त्यांना, पत्रकारांना MISA या कायद्याखाली तुरुंगात टाक ले गेले. आणिबाणीचे विश्लेषण करतांना आचार्य राममुर्ती म्हणतात ‘‘संपुर्ण देश हा एक तुरुंगच झाला होता.’’ अर्थात आणिबाणीमुळे संसदिय लोकशाही देश पंतप्रधानात्मक हुकूमशाहीत रुपांतरीत झाला होता. या आणिबाणीतून निर्माण झालेल्या इंदिरा गांधीच्या हुकूमशाही व्यवस्थेला अनेकांनी कडाडून विरोध केला. यात जॉर्ज फर्नांडीस, मोरारजी देसाई, अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण आडवाणी, राम जेठमलानी, मृणाल गोरे, भाई वैद्य, पण्णालाल सुराना, बापुसाहेब काळदाते यासारख्या विचारवंतांनी, नेत्यांनी आणिबाणीच्या तुरुंगवास भोगावा लागला. आणिबाणीला सर्व स्तरातून होणाऱ्या कडाडून विरोधामुळे इंदिरा गांधी यांना शेवटी माघार घ्यावी लागली. यातुन जागरुक राष्ट्रवादी समाज निर्माण होण्यास मदत झाली. आणिबाणीमुळे संसद आणि लोकशाहीची प्रतिष्ठा धुळीस मिळाली होती ती आणिबाणीनंतर पुन्हा प्रस्थापित होण्यास मदत झाली. इंदिरा गांधी या भारतीय राजकारणातील एक नवा प्रवाह होता. इंदिरा गांधी यांनी भारतीय राजकारणाची दिशा बदलली. राजकारणातील सर्व संकेत मोडून राजकारणात नवीन आयाम निर्माण केल्या. हे तत्कालीन राजकारणाच्या विरोधी होते. म्हणुन त्यांना सर्वात जास्त विरोधक तयार, निर्माण झाले होते. इंदिरा गांधी यांना पक्षांतर्गत विरोधक, विरोधी पक्षातील विरोधक, अंतर्गत समस्यातून निर्माण झालेली गुजरात आणि बिहारमधील आंदोलने यामुळे निर्माण झालेली अस्थिरता, अशांतता, अराजकता यावर उपाय म्हणुनच इंदिरा गांधी यांना आणिबाणीचा निर्णय घ्यावा लागला हे यावरुन दिसून येते.

**संदर्भग्रंथ :-**

१. Indira Gandhi Era in Indias Democracy, संपादक Dr.A.N.Sidhewad, अभय प्रकाशन, नांदेड.
२. इंदिरा गांधी आणिबाणी व भारतीय लोकशाही, पी.एन.धर, रोहन प्रकाशन, पुणे.
३. इंदिरा अंतिम पर्व, पी.सी.अलेक्झांडर, अनु अशोक जैन, पुणे.
४. Indira Gandhi, Wikipedia.